**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती संजीवनी मनोहर पवार
सी/२८, मनमोहन पार्क, बिबवेवाडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त क्र.१,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/०३/२०२० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्त्या** श्रीमती संजीवनी मनोहर पवार
सी/२८, मनमोहन पार्क, बिबवेवाडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त क्र.१,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.श्रीनिवास केदार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि. २३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या आईच्या घराला भाडेकरूने लावलेली नावे कमी करण्याबाबत आपण अर्ज देऊनही नावे कमी केली नाहीत. त्याबाबतची आपण मागितलेली माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती संजीवनी मनोहर पवार यांनी केली.

श्रीमती पवार यांनी मगितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली. कोणत्याही कागदपत्राच्या प्रती त्यांनी मागितल्या नव्हत्या. अतिरिक्त माहिती आठ दिवसात देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर यांनी दिले. परंतु त्यानंतर या मिळकतीसंदर्भातील घरफाळाविषयक कामकाजाची संपूर्ण संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करणारा अर्ज श्रीमती पवार यांनी केला. त्यानुसार संपूर्ण संचिका त्यांना अवलोकनासाठी दिली. त्यातील त्यांनी मागितलेली सर्व माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.श्रीनिवास केदार व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती तीन दिवसात देण्याचे मौखिक आदेश आयोगाने दिले. आपण स्वत: कोल्हापूर येथे जाऊन या प्रती स्वीकारणार असल्याचे श्रीमती पवार यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मल्हारी विठ्ठल रामोशी
कांदलगाव, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर,
इंदापूर तहसील कार्यालय, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर,
इंदापूर तहसील कार्यालय, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मल्हारी विठ्ठल रामोशी
कांदलगाव, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर,
इंदापूर तहसील कार्यालय, जि.पुणे श्री.एन.पी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर,
इंदापूर तहसील कार्यालय, जि.पुणे श्री.एच.एस.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती मिळाली असून आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.मल्हारी विठ्ठल रामोशी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोकुळ विष्णु भोर
मु.भोरवाडी,पो.हिवरे बु.,
ता.जुन्नर,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मोरवाडी, पो.हिवरे बु,
ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६४/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०३.२०१० |
| ३) | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एच.आर.गरीबे<br>**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरवाडी, पो.हिवरे बु, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.मंगेश कृष्णा ठोंगीरे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.०३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०५.०७.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गोकुळ विष्णु भोर यांनी मागितलेल्या माहितीबाबत रु.१२७१/- शुल्क कळविले. त्यांनी ते भरले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत

समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यांनीही प्रथम अपिलाच्या निर्णयात त्यांना शुल्काबाबत जाणीव दिली. त्यांनी अद्याप शुल्क भरलेले नाही. शुल्क भरताच माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरवाडी, पो.हिवरे बु., ता.जुन्नर, जि.पुणे श्री.मंगेश कृष्णा ठोंगीरे यांनी केले. अर्जाचे उत्तर म्हणून पाठविलेल्या पाकिटात कोरे कागद मिळाले, असे अपीलकर्ता श्री.भोर यांनी म्हटले आहे. आपल्या मुलाच्या उच्च शिक्षणासाठी कर्ज घ्यावयाचे असतांना माहिती न दिल्यामुळे अडचण आली, म्हणून तत्कालीन ग्रामसेवक श्री.एच. बी. ढमढेरे, उपसरपंच श्री.बाबाजी सावळेराम भोर व अपिलीय प्राधिकारी विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.एच.आर.गरीबे यांच्याकडून रु. १,००,०००/- वसूल करुन मुलाची फी भरावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.भोर यांनी ' विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या' प्रपत्रात नमूद केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत अशी मागणी दखलयोग्य नाही.

सेवानिवृत्त ग्रामसेवक श्री.एच.बी.ढमढेरे व सरपंच श्री.बाळाजी सावळेराम भोर यांनी दबाव आणल्यामुळे कागदपत्र देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरवाडी, पो.हिवरे बु., ता.जुन्नर, जि.पुणे श्री.मंगेश कृष्णा ठोंगीरे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. ही नोंद आपण चुकीने केली असून असा दबाव नव्हता, असे निवेदन श्री. ठोंगीरे यांनी केले. माहिती देण्याबाबतच्या कार्यवाही विषयी त्यामुळे साशंकता निर्माण होते. अशा प्रकारे उलटसुलट विधाने न करण्याची समज श्री.ठोंगीरे यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य
२. अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती आठ दिवसांत निःशुल्क देऊन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरवाडी, पो.हिवरे बु., ता.जुन्नर, जि.पुणे श्री.मंगेश कृष्णा ठोंगीरे यांनी आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि.** 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संपत माधव त्रिभुवन
भिमार्थ, इंगळेनगर, सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, हडपसर विद्यालय
व ज्युनिअर कॉलेज, रामटेकडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संपत माधव त्रिभुवन
भिमार्थ, इंगळेनगर, सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे, जि.पुणे प्रतिनिधी श्री.के.एन.चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, हडपसर विद्यालय
व ज्युनिअर कॉलेज, रामटेकडी, पुणे श्री.एस.पी.खारतोडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.७.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संपत माधव त्रिभुवन यांनी सन १९९१ पासूनची अनेक विषयाबाबतची विस्तृत माहिती मागितली होती. त्यांच्या विविध अर्जांनुसार वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हडपसर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, रामटेकडी, पुणे श्री.एस.पी.खारतोडे यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.के.एन.चौधरी यांनी त्याला दुजोरा दिला. त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संपत माधव त्रिभुवन
भिमार्थ, इंगळेनगर, सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री.म्हातोबा तुकाराम
बालवडकर विद्यालय, बालेवाडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे प्रतिनिधी श्री.के.एन.चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री.म्हातोबा तुकाराम बालवडकर विद्यालय,
बालेवाडी, पुणे श्री.शांताराम यशवंत पोखरकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | २४.७.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता प्रा.माधव संपत त्रिभुवन यांनी मागितलेली माहिती तयार असून शुल्क रूपये ११२५/- भरण्यास विहित मुदतीत कळविले. शुल्काबाबतचा खुलासा त्यांनी मागितला, तोही दिला. त्यांनी शुल्क भरलेले नाही. त्यामुळे तयार असूनही माहिती देता आली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी अपीलकर्ता यांना सुनावणीच्या दोन तारखांच्या वेळीही माहिती तयार असल्याचे दाखविले. वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही अपीलकर्त्यांनी शुल्क भरून माहिती नेलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री म्हातोबा तुकाराम बालवडकर विद्यालय, बालेवाडी, पुणे श्री.शांताराम यशवंत पोखरकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले, ते रास्त असल्याचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.के.एन.चौधरी यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व उपरोक्त निवेदन लक्षात घेता अपीलकर्त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. माहिती हवी असल्यास शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजीराव रामचंद्र कुंजीर
माजी आमदार, ६९९/२अ, मुकुंदनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह
निधी पथक (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजीराव रामचंद्र कुंजीर
माजी आमदार, ६९९/२अ, मुकुंदनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे प्रतिनिधी श्री.के.एन.चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह
निधी पथक (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.ए.जी.बनसोडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.२.२००८ व २७.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.२.२००८ व १७.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

नेहरू शिक्षण संस्थेच्या दोन शाळांमधील रजेबाबतच्या शाळा समितीच्या ठरावाच्या प्रती आपण जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक(माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे मागितल्या होत्या. त्या मिळाल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी ठरावाच्या प्रती देण्याबाबत संबंधित शाळाच्या मुख्याध्यापकांना पत्र पाठविले. परंतु आपल्याला माहिती त्यांच्याकडून नको आहे. आपल्या दोन्ही अर्जांनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडूनच ही माहिती आपल्याला हवी आहे. वैद्यकीय व इतर रजा शाळा समितीच्या ठरावाशिवाय मंजूर करता येत नाहीत, अशी माध्यमिक शाळा संहितेमधील तरतूद आहे. परंतु या संस्थेत शाळा समितीच्या सभा झालेल्या नाहीत आणि रजेच्या काळातील देयके मात्र देण्यात आली आहेत. हा नियमबाह्य प्रकार आहे. नियमबाह्य काम करून माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संभाजीराव रामचंद्र कुंजीर यांनी केली.

रजा मंजुरीच्या आदेशाच्या प्रती आदी माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्या आदेशानंतर शाळेकडूनही काही

पत्रान्वये सादर केलेल्या खुलाशात नमूद केले आहे. त्यांचा खुलासा मान्य करून विलंब क्षमापित करण्यात येत आहे. मात्र अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले जाणे आवश्यक असल्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चिंतामण आनंदा यादव
ताडीवाला रोड, पानमळा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,
पुणे जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा समाजकल्याण निरीक्षक,
पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,
पुणे जिल्हा परिषद, पुणे प्रतिनिधी श्री.डी.आर.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा समाजकल्याण निरीक्षक,
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.यु.के.लोकापक्षी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.८.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.९.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

मान्यता रद्द केलेल्या वसतीगृहाच्या संदर्भात गैरप्रकार घडले असून बहुजन शिक्षक संघ, अहमदनगर संचलित महेंद्र विद्यार्थी वसतीगृह, ताडीवाला रोड, पुणेची मान्यता रद्द करण्याच्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण निरीक्षक, पुणे जिल्हा परिषद, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्या पातळीवर दिली जात नाही. आदेशाच्या प्रतीसह संपूर्ण माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.चिंतामण आनंद यादव यांनी लेखी निवेदनात केले आहे.

श्री.यादव यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीच्या आत दिली. संबंधित वसतीगृहाची मान्यता रद्द करण्याच्या निर्णयाविरूध्द त्या संस्थेने केलेल्या अपिलाची सुनावणी सामाजिक न्याय विभाग, मुंबई यांच्याकडे दि.५.९.२००८ रोजी झाली. परंतु त्यांचा आदेश प्राप्त झाला नसल्यामुळे संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून वसतीगृह मान्यता रद्द करण्याचे आदेश पारित करण्यात आले नाहीत, त्यामुळे आदेशाची प्रत देता आली नाही. सदरचे आदेश प्राप्त होताच श्री.यादव यांना उपलब्ध करून देण्यात येतील, असे अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.बी.एस.कवटे यांनी दि. ३०.३.२०१० च्या लेखी निवेदनाद्वारे नमूद केले आहे.

संबंधित वसतीगृहाच्या मान्यतेबाबतची सद्यस्थिती व मान्यता रद्द करण्याच्या मूळ निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) बहुजन शिक्षक संघ, अहमदनगर संचलित महेंद्र विद्यार्थी वसतीगृह, ताडीवाला रोड, पुणे या वसतीगृहाच्या मान्यतेबाबतची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण निरीक्षक, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी अपीलकर्त्यास कळवावी. तसेच मान्यता रद्द करण्याच्या निर्णयाची आदेश प्रसृत केला असल्यास त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.नितीन यु. भंडारे — अपीलकर्ता
कुदळे पाटील पॅलेस फ्लॅट नं.१४, माणिकबाग स्टॉपजवळ, सिंहगड रोड, पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था शहर उपविभाग,
पुणे(१), ५८२/डी, गुलटेकडी मार्केट यार्ड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.केदारी जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था शहर उपविभाग,
पुणे(१), ५८२/डी, गुलटेकडी मार्केट यार्ड, पुणे श्री.विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड.नितीन यु.भंडारे यांनी सहकारी गृहरचना संस्थेच्या संदर्भात माहिती मागितली होती. अपीलकर्ता आतापर्यंत सुनावणीला कधीही हजर नव्हते. कागदपत्रे पाहून गुणवत्तेवर निर्णय घ्यावा, असे लेखी निवेदन त्यांनी दि.३०.३.२०१० रोजी दिले.

संस्थेची अ धारिका कार्यालयात आढळ होत नसल्याचे त्यांना कळविले. संबंधित संस्थेच्या दप्तरावरून अ धारिका तयार करून अपीलकर्त्यास प्रती उपलब्ध करून द्याव्यात, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दिले. संस्थेकडून प्राप्त करून घेतलेली माहिती टपालाने पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर उपविभाग, पुणे(१), पुणे श्री.विनायक कोकरे यांनी केले. पुण्यात सहकारी गृहरचना संस्थांचे प्रमाण वाढले आहे. जुन्या संस्थाही मोठ्या प्रमाणावर आहेत. अनेकदा त्यांचे अभिलेख उपलब्ध होत नाहीत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.केदारी जाधव यांनी केले.

सहकारी गृहरचना संस्थेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली नियंत्रक अधिकारी म्हणून नियमानुसार प्राप्त करून घेता येण्यासारखी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अन्य माहितीबाबत उच्च

न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्कर शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयोग, नागपूर व इतर दोन (रिट पिटीशन ५२९४ / २००८, दि.२८ एप्रिल २००९) या प्रकरणी दिलेला निर्णय लक्षात घेता माहिती देण्याचे बंधन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर उपविभाग, पुणे(१), पुणे यांच्यावर असणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नंदकुमार रामचंद्र वर्णे
६५६, रविवार पेठ, बोहरी जमातखान्यासमोर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१,
खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नंदकुमार रामचंद्र वर्णे
६५६, रविवार पेठ, बोहरी जमातखान्यासमोर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१,
खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे श्री.सुनिल वाणी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.५.२००८ व २७.६.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.६.२००८ व २४.७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

नकाशामध्ये दाखविलेला सार्वजनिक बोळ हा खाजगी की सरकारी मालकीचा आहे, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगरभूमापन अधिकारी क्र.१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.नंदकुमार रामचंद्र वर्णे यांनी केली.

संबंधित जागेबाबत अभिलेखात कोणतीही नोंद नाही, फक्त खुली जागा आहे. या जागेचा ७/१२ उतारा अथवा मिळकतपत्रिका नाही. तसेच या बोळाच्या मालकीबाबतचा वाद दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. अभिलेखानुसार उत्तर दिले असून न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रश्नाविषयी निष्कर्ष अथवा भाष्य देता येणार नाही, हे स्पष्ट केले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.प्रताप गुलाबराव पागळे (अ.क्र.२३२४)
मु.पो.जळोची, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता
(२)श्री.प्रमोदकुमार छोटुभाई देसाई (अ.क्र.२५७२)
अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,
जळोची, ता.बारामती, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,
जळोची, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२४+२५७२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रताप गुलाबराव पागळे
मु.पो.जळोची, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बारामती, जि.पुणे श्री.बी.एस.साळवे

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,
जळोची, ता.बारामती, जि.पुणे श्री.पी.सी.देसाई

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

गावाच्या पाणीपुरवठा योजनेसाठी जमविलेल्या लोकवर्गणीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.प्रताप गुलाबराव पागळे यांनी मागितली होती. त्या संदर्भात अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे ( अ.क्र.२३२४). मूळ प्रकरणी श्री.पागळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बारामती, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. माहिती देण्याचा आदेश देऊन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बारामती, जि.पुणे यांनी अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत जळोची, ता.बारामती, जि.पुणे श्री.प्रमोद छोटूभाई देसाई यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दंड करण्याची शिफारस आदेशात केली. त्याविरूध्द श्री.देसाई यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. (अ.क्र.२५७२).

माहिती विस्तृत असल्यामुळे विलंब लागेल असे व शुल्क भरण्यास श्री.पागळे याना कळविले. त्यांनी शुल्क भरले नाही, म्हणून माहिती देण्याचा प्रश्न आला नाही. पाणीपुरवठा समिती शासननियुक्त नाही, तसेच लोकवर्गणीपुरतेच तिचे काम मर्यादित आहे. ती ग्रामपंचायतीचा भाग नाही, तरीही माहिती देऊ केली होती. श्री.पागळे यांनी एक रूपयाही लोकवर्गणी दिली नाही. तसेच कळविलेले शुल्कही भरले नाही. शुल्क प्राप्त झाल्यास कोणत्या खात्यात भरून घ्यावे याबाबत

बारामती, पंचायत समितीकडे मागितलेले मार्गदर्शन गटविकास अधिकाऱ्यांकडून मिळाले नाही, असे प्रतिपादन अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, जळोची, ता.बारामती, जि.पुणे श्री.प्रमोदकुमार छोटुभाई देसाई यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह केले. मात्र शुल्क भरण्यास आपण तयार होतो, परंतु श्री.देसाई यांनी चलनावर सही न केल्यामुळे शुल्क भरता आले नाही, असे प्रतिपादन श्री.पागळे यांनी केले. पाणीपुरवठा समितीवर शासकीय अनुदान व नियंत्रण नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बारामती, जि.पुणे श्री.बी.एस.साळवे यांनी नमूद केले.

अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, जळोची, ता.बारामती, जि.पुणे श्री.देसाई यांनी योग्य कार्यवाही केली आहे. शुल्काबाबतचे मार्गदर्शन गटविकास अधिकाऱ्यांनी त्याना करणे आवश्यक होते. दंडाची शिफारस करण्याचा अधिकार अपिलीय प्राधिकाऱ्यांना नाही, हे श्री.देसाई यांचे प्रतिपादन रास्त नाही. उलट निष्कर्षाचा भाग म्हणून आवश्यक असल्यास अपिलीय प्राधिकाऱ्यांनी शास्तीबाबतचा अभिप्राय नोंदविला पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील क्र.२३२४ अमान्य करण्यात येत आहे. अपील क्र.२५७२ मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.प्रमोदकुमार छोटुभाई देसाई यांच्या विचारणेनुसार शुल्क कोणत्या खात्यात भरावे याबाबतचे पत्र अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांनी श्री.देसाई यांना द्यावे व त्यानुसार शुल्क भरून श्री.प्रताप गुलाबराव पागळे यांनी माहिती आवश्यक तर घ्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. किरण प्रेमचंद भंगाळे
३५, आनंदनगर, स्विमींग टँक समोर,
१२/१, सांगवी, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली
ता. हवेली, जि. पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली, ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. किरण प्रेमचंद भंगाळे<br>३५, आनंदनगर, स्विमींग टँक समोर,<br>१२/१, सांगवी, पुणे-२७<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली<br>ता. हवेली, जि. पुणे श्री. विजय पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>हवेली, ता. हवेली, जि. पुणे श्री. जगदीश ह. निंबाळकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.४.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एका जमिनीच्या संदर्भातील कायमस्वरुपी जतनाचे अभिलेख असलेल्या अ पत्रकांच्या छायांकित प्रती मिळण्याची मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, ता. हवेली यांच्याकडे केली होती. त्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली यांनी अपिलाचा निर्णयही दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. किरण प्रेमचंद्र भंगाळे यांनी केली.

श्री. भंगाळे यांनी सन १९८३ पासूनच्या अ पत्रकांची मागणी केली होती. त्यावेळी अ पत्रके दुय्यम निबंधक कार्यालयाकडून पाठविली जात, त्यामुळे त्या कार्यालयाशी संपर्क साधण्यास श्री. भंगाळे यांना कळविले व फेरफाराचा अर्ज केल्यास नियमानुसार नकला देण्यात येतील, असेही कळविले. २५ वर्षांपूर्वीची माहिती असल्यामुळे फेरफाराप्रमाणे ठेवल्या जाणाऱ्या नोंदींचे अवलोकन आवश्यक वाटल्यास अपीलकर्त्यास करता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. जगदीश ह. निंबाळकर यांनी केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले आहे. मात्र अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली यांनी अपिलाचा निर्णय लेखी स्वरुपात देणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. संजीव देशमुख व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. विजय पाटील यांना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्याने आवश्यक तर फेरफार नोंदींचे अवलोकन करून नकला प्राप्त करून घ्याव्यात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा, ता. पुरंदर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती दहिवडी-माण ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२७+२३२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.३.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नामदेव बाबासाहेब खरात
नितीराज निवास, निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद, जि. सातारा श्री. एच.पी. मुळुक

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती दहिवडी-माण ता. माण, जि. सातारा श्री. विलास पोपाट जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अंगणवाडी सेविकांच्या नेमणुकीत नियमबाह्य कार्यपध्दती अवलंबली गेली, त्याबाबत आपण दिलेल्या निवेदनावरील कार्यवाही व आठ ग्रामस्थांनी दिलेला तक्रार अर्ज या संदर्भातील माहिती दिली

नाही, या तक्रार अर्जानुसार योग्य प्रकारे चौकशी झाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी केली.

अपील क्र.२३२८ मधील माहितीबाबत योग्य कार्यवाही करुन श्री. खरात यांनी कळविलेले शुल्क भरल्यानंतर रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. अपील क्र.२३२७ बाबत कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही, त्यामुळे त्याबाबतची माहिती दिली नाही. तसेच भरती प्रक्रियेत बेकायदेशीर बाबी घडल्याची त्यांची तक्रार रास्त नाही. तथापि तशी तक्रार असल्यास ते योग्य त्या मार्गाने दाद मागू शकतात. त्याच त्याच मुद्दयांबाबत व प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीसाठी व्यक्तिगत विषयाकरिता श्री. खरात यंत्रणेवर अकारण ताण निर्माण करतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माण (दहिवडी) श्री. विलास पोपट जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा श्री. एच. पी. मुळुक यांनी केले. कार्यालयीन पत्रे पाठविल्याची जावक बारनिशीसह कागदपत्रांमध्ये नोंद असून आपल्याला पत्र न मिळाल्याचे श्री. खरात सांगतात, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

भरती प्रक्रियेतील बाबींचा कायदेशीरपणा / बेकायदेशीरपणा ठरविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी पत्रव्यवहार केल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. तरीही अपवादात्मक भाग म्हणून पुन्हा एकदा अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माण (दहिवडी) यांनी दि. ३.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 APR 2010

माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल दिनकर दरेकर
रा.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३०+२३३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.६.२००८ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर न राहिल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती उघड झाल्यास लाखो रूपयांचा भ्रष्टाचार जाहीर होईल, म्हणून माहिती दिली जात नाही, असे अपीलकर्ता श्री.विठ्ठल दिनकर दरेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात म्हटले आहे.

श्री.दरेकर यांनी मागितलेली विशिष्ट देवस्थानचे दागिने आदींची माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नसते. त्यांच्या अर्जातील माहिती न्यासाच्या स्तरावरील असल्यामुळे तसे स्पष्ट केले असे जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील यांनी नमूद केले.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्कर शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयोग, नागपूर व इतर दोन (रिट पिटीशन ५२९४ / २००८, दि.२८ एप्रिल २००९) या प्रकरणी दिलेला निर्णय लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे यांनी केलेले स्पष्टीकरण योग्य आहे. तथापि तशा आशयाचे नेमके पत्र अपीलकर्त्यास देणे आवश्यक होते, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्याम वसंतराव आमले
कोंढवे-धावडे, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर,
फायनान्स रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.चिंतामणी जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर,
फायनान्स रोड, पुणे श्री.व्ही.डी.धनशेट्टी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

शुल्क स्वीकारूनही दस्ताची प्रमाणित नक्कल जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर, पुणे यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.श्याम वसंतराव आमले यांनी केली.

अपीलकर्त्याने मूळ अर्जात 'करारनामा' असे नमूद केले असल्यामुळे शुल्क आकारले. परंतु अभिलेखाचे अवलोकन करता संबंधित दस्तऐवज हा करारनामा नसून मुखत्यारपत्र असल्याचे आढळले. मुखत्यारपत्राची प्रत कायद्यानुसार संबंधित व्यक्तीशिवाय कोणालाही देता येत नाही. त्यामुळे नक्कल देता येत नसल्याचे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर, पुणे श्री.व्ही.डी.धनशेट्टी यांनी केले. त्यांचा निर्णय योग्य असला तरी शुल्क कळवितानाच संबंधित दस्तऐवजाबाबतची खातरजमा त्यांनी करून घेणे आवश्यक होते. यापुढे याबाबत दक्षता घेण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

या स्थितीत कागदपत्रांच्या प्रती न देता शुल्क घेण्याचा अधिकार जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर, पुणे यांना नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास आकारलेली शुल्काची रक्कम त्वरित परत करून अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर, पुणे यांनी दि.२५.५.२०१० पर्यंत आयोगाला [illegible] सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्री.ए.फडके
अंकिता चेंबर्स, सीटीएस नं.३५१, शिवाजी रोड, शुक्रवार पेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर-१, ५८२/डी, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्री.ए.फडके
अंकिता चेंबर्स, सीटीएस नं.३५१, शिवाजी रोड, शुक्रवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे प्रतिनिधी श्री.बी.आर.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर-१, ५८२/डी, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे श्री.विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.८.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अंकिता सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये अध्यक्ष श्री.आमराळे यांनी सुरू केलेल्या हॉटेलमुळे व मोकळ्या जागेतील अतिक्रमणामुळे आपल्याला त्रास होत असून हॉटेलचा परवाना रद्द करावा व अतिक्रमण हटवावे, अशी मागणी आपण वारंवार करूनही कारवाई केली जात नाही व योग्य माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.श्री.ए.फडके यांनी केली.

हॉटेलचा परवाना रद्द करण्याची बाब आपल्या कार्यालयाच्या कक्षेत येत नाही, हे श्री.फडके यांना वेळोवेळी स्पष्ट केले आहे. तसेच गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीने हॉटेल चालविण्यास परवानगी दिली आहे की नाही, याबाबतची श्री.फडके यांची तक्रार लक्षात घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेश उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर-१ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिले. संस्थेच्या सर्वसाधारण सभेने ठराव करून तशी परवानगी दिली असल्याचे निष्पन्न झाले. तशी माहिती श्री.फडके यांना दिली, असेही प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर-१ श्री.विनायक कोकरे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. श्री.फडके यांच्या अर्जातील प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**

29 APR 2010